# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

(पूर्वीचे पुणे विद्यापीठ)

**Savitribai Phule Pune University**

(formerly University of Pune)

## नोंदणीकृत पदवीधरांची अधिसभेवरील निवडणूक

## जाहीर प्रकटन

महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६, कलम २८(२)(न)[(28(2)(t)] व कलम १३१ मधील तरतुदीनुसार सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे दहा (१०) नोंदणीकृत पदवीधर (**Registered Graduates**) अधिसभेवर (**Senate**) निवडून द्यावयाचे आहेत. या निवडणुकीसाठी महाराष्ट्र शासनाने निर्गमित केलेले सन २०१७ चे एकरुप परिनियम क्र. १ मधील नियम क्र. ८ च्या तरतूदीनुसार तयार करण्यात आलेली नोंदणीकृत पदवीधर मतदारांची तात्पूरती मतदार यादी तसेच तसेच त्रुटी असलेल्या अर्जांची यादी (त्रुटींसह) विद्यापीठाच्या **election.unipune.ac.in** या संकेतस्थळावर दि. २१ ऑगस्ट, २०१७ रोजी प्रसिध्द केली व ज्या नोंदणीकृत पदवीधर मतदारांच्या नावांबाबत चुकीची नोंद असल्यास, नाव वगळले गेले असल्यास अथवा मतदार यादीत अन्य काही दुरुस्ती/आक्षेप असल्यास **मंगळवार, दिनांक २२ ऑगस्ट, २०१७ ते शनिवार, दिनांक २६ ऑगस्ट, २०१७ रोजी, संध्याकाळी ६.०० वाजेपर्यंत** विद्यापीठाच्या संकेतस्थळामार्फत सादर करण्यात यावेत. तसेच **गुरुवार, दिनांक ३१ ऑगस्ट, २०१७ रोजी, सायंकाळी ६.०० वाजेपर्यंत** विद्यापीठाच्या निवडणुक विभागाकडे संबंधित ऑनलाईन अर्जाची छापील प्रत आवश्यक त्या कागदपत्रांसह प्रत्यक्ष अथवा पोस्टाद्वारे पाठविण्यात यावी. त्यानंतर आलेल्या अर्जांचा विचार केला जाणार नाही, असे कळविण्यात आले होते.

परंतु, नोंदणीकृत पदवीधरांची नोंदणी, मतदार नोंदणीसाठी विद्यापीठाने ठरवून दिलेल्या काही महाविद्यालयातील मदत केंद्रांनी त्यांच्याकडे नोंदणी झालेले अर्ज विद्यापीठाकडे विहित मुदतीत सादर केले नसल्याचे निर्देशनास आल्याने व असे मतदार निवडणूकीच्या प्रक्रियेपासून बाहेर राहू नयेत म्हणून संबंधित महाविद्यालयांकडून त्यांच्याकडे विहित मुदतीत प्राप्त झालेले, परंतु विद्यापीठ कार्यालयाकडे सादर न केलेले अर्ज दि. ७ सप्टेंबर, २०१७ रोजी, सायंकाळी ६.०० वाजेपर्यंत मागविण्यात आले. या मुदतीत प्राप्त झालेल्या अर्जांची छाननी करुन नोंदणीकृत पदवीधरांची तात्पुरती पुरवणी मतदार यादी तसेच यातील त्रुटी असलेल्या अर्जांची यादी (त्रुटींसह) विद्यापीठाच्या **election.unipune.ac.in** या संकेतस्थळावर दि. ११ सप्टेंबर, २०१७ रोजी प्रसिध्द केली आहे व ज्या नोंदणीकृत पदवीधर मतदारांच्या नावांबाबत चुकीची नोंद असल्यास, नाव वगळले गेले असल्यास अथवा मतदार यादीत अन्य काही दुरुस्ती/आक्षेप असल्यास खाली नमूद केलेल्या पध्दतीने **मंगळवार, दिनांक १२ सप्टेंबर, २०१७ ते शनिवार, दिनांक १६ सप्टेंबर, २०१७ रोजी, संध्याकाळी ६.०० वाजेपर्यंत** विद्यापीठाच्या संकेतस्थळामार्फत सादर करण्यात यावेत. तसेच **शुक्रवार, दिनांक २२ सप्टेंबर, २०१७ रोजी, सायंकाळी ६.०० वाजेपर्यंत** विद्यापीठाच्या निवडणुक विभागाकडे संबंधित ऑनलाईन अर्जाची छापील प्रत आवश्यक त्या कागदपत्रांसह प्रत्यक्ष अथवा पोस्टाद्वारे पाठविण्यात यावी. त्यानंतर आलेल्या अर्जांचा विचार केला जाणार नाही.

१) एखादा दस्तऐवज Upload केलेला नसल्यास किंवा चूकीचा दस्तऐवज Upload केलेला असल्यास विद्यापीठाच्या **election.unipune.ac.in** या संकेतस्थळावर अर्जाचा क्रमांक नमूद केल्यास तो दस्तऐवज Upload करता येईल. अशाप्रकारे Upload केलेल्या दस्तऐवजाची व अर्जाची प्रत काढून (Printout) विहित मुदतीत विद्यापीठाकडे सादर करावी.

..२..

२) एखाद्या दस्तऐवजाची छायाकिंत प्रत मूळ अर्जासोबत सादर केलेली नसल्यास किंवा चूकीचा दस्तऐवज जोडलेला असल्यास विद्यापीठाच्या **election.unipune.ac.in** या संकेतस्थळावर अर्जाचा क्रमांक नमूद करावा व अर्ज अद्ययावत (Update) करावा आणि अशाप्रकारे अद्ययावत (Update) केलेल्या अर्जाची प्रत काढून (Printout) आवश्यक त्या दस्तऐवजांसह विहित मुदतीत विद्यापीठाकडे सादर करावी.

३) सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे (पूर्वीचे पुणे विद्यापीठ) वैद्यक, आयुर्वेद, होमिओपॅथी, युनानी आदी विद्याशाखांतील पदवीधरांनी, ते नाशिक येथील महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठाचे नोंदणीकृत पदवीधर नसल्याचे या परिपत्रकास जोडलेल्या विहित नमुन्यातील हमीपत्र, त्यांच्या अर्जाचा क्रमांक नमूद केल्यास Upload करता येईल. अशाप्रकारे हमीपत्र Upload केल्यानंतर अर्जाची प्रत काढून (Printout) मूळ हमीपत्रासह विहित मुदतीत विद्यापीठाकडे सादर करावे

११/९/१७

(डॉ.अरविंद दिगंबर शाळीग्राम)
प्रभारी कुलसचिव

गणेशखिंड, पुणे ४११ ००७
संदर्भ क्र. : साफुपुविनि/ १२३
दिनांक : ११/०९/२०१७